अवाना
एम्बी इंडस्ट्रीज लिमिटेड
कॉर्पोरेट ऑफिस: दानी कॉर्पोरेट पार्क, S-C लिंक रोड, कलिना मुंबई – 400 098
रजिस्टर्ड ऑफिस: 99/2/1 व 9 मधुबन इंडस्ट्रियल इस्टेट, मधुबन डॅम रोड, राखोली गाव केंद्रशासित प्रदेश, दादरा व नगरहवेली, सिलवासा – 396 230 | फोन: 022-4672 5555, टोल फ्री क्रमांक: 1800 266 6618

# वॉरंटी प्रमाणपत्र (Warranty Form)

**ग्राहकाचे नावः**..............................................................................................................................

**पत्ताः**.............................................. **गावाचे नावः**.............................................. **तालुकाः**................................... **जिल्हाः**...................................

**मोबाईल नंबरः 1)** .............................................................................. **2)**..............................................................................

**आधार कार्ड नंबरः**.............................................................................. **शेततळयाचा आकारः**..............................................................................

*** वॉरंटीच्या नियम आणि अटी ***

**१. एम्बी इंडस्ट्रीज लिमिटेड ही "अवाना जलसंचय" या ब्रँडची उत्पादक कंपनी ब्युरो ऑफ इंडिया स्टँडर्ड्सने (बीआयएस) आखून दिलेल्या आयएसः १५३५१ २०१५ ची पूर्तता करते.**

**२. ही वॉरंटी वॉटरप्रूफ लायनिंगसाठी (ज्याला यानंतर उत्पादन या नावाने संबोधित केले जाईल टेक्स्टाइल्स लॅमिनेटेड हाय डेन्सिटी पॉलिथिलिन वोव्हन जिओमेंब्रेनच्या एम्बी इंडस्ट्रीज लिमिटेडकडून (यानंतर पुरवठादार या नावाने संबोधित) ग्राहकाला या उत्पादनाची रचना सामान्य वापर तसेच सेवेसाठी केलेली आहे त्या शेततळयांमधील पाणीसाठ्यासाठी लायनिंगच्या पुरवठ्याशी संबंधित आहे.**

**३. पुरवठादार या गोष्टीची हमी देत आहे की पुरवठा केलेले उत्पादन हे साहित्यातील दोषांपासून मुक्त आहे आणि ते सर्वसाधारण घर्षण आणि वापरामध्ये तग धरू शकेल. पुरवठा केल्या गेलेल्या उत्पादनाची जाडी ही नियत केल्याप्रमाणे ३००/५०० मायक्रॉन आहे. पुरवठादाराकडून ५०० मायक्रॉनसाठी ५ वर्षांची तर ३०० मायक्रॉनसाठी ३ वर्षांची हमी कापडातील कोणत्याही उत्पादकांशी संबंधित दोषांबाबत किंवा फक्त सूर्याच्या अतीनील किरणांपासून झालेल्या नुकसानासाठी दिली जाईल. स्थापना करणारी कंपनी (वितरक किंवा विक्रेता) ५०० मायक्रॉनसाठी ५ वर्षांची आणि ३०० मायक्रॉनसाठी ३ वर्षांची हमी चुकीच्या पद्धतीने स्थापना केल्यामुळे उद्भवलेल्या दोषांच्या दुरुस्तीसाठी देईल.**

**४. पुरवठा केलेल्या उत्पादनात एखादा उत्पादनाशी संबंधित दोष आढळल्यास हा दोष कळल्याच्या तारखेपासून १० दिवसांच्या आत पुरवठादाराला लेखी स्वरूपात कळवला गेला पाहिजे. ग्राहकाला सदर दोष १० दिवसांत कळवणे शक्य न झाल्यास हा दावा वैध नसल्याचे गृहित धरले जाईल.**

**५. तळयाच्या लायनरचे कापड अंथरण्यापूर्वी ग्राहकाने तळयाच्या क्षेत्रातून सर्व गोटे, दगड, झाडांची मुळे, काचेचे तुकडे इत्यादी काढून टाकणे गरजेचे आहे. संपूर्ण तलावाचे फिनिशिंग आणि सपाटीकरण यांच्यासाठी ग्राहक जबाबदार राहतील जेणेकरून तळयाच्या लायनिंगची स्थापना अचूकपणे करता येईल. या प्रक्रियेचे पालन न केल्यास पुरवठादार आणि पॉन्ड लायनर स्थापन करणारी कंपनी / व्यक्ती कोणत्याही नुकसानासाठी जबाबदार असणार नाही.**

**६. या उत्पादनाची स्थापना पुरवठादाराने प्रमाणित केलेल्या तंत्रज्ञानेच करणे गरजेचे आहे, इतर कोणत्याही व्यक्तीने नाही. पुरवठादाराने प्रमाणित न केलेल्या एखाद्या व्यक्तीने उत्पादनाची स्थापना केल्यास व्हेंडरच्या प्रतिनिधीला त्याची माहिती देणे गरजेचे आहे.**

**७. प्रचंड पाऊस असल्यास किंवा वेगाने वारे वाहत असल्यास, तलावात पाणी, दलदल किंवा चिखल इत्यादी गोष्टी असल्यास उत्पादनाची स्थापना केली जाणार नाही. तरीही उत्पादन स्थापित केले गेल्यास त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही समस्यांसाठी ग्राहक जबाबदार असतील.**

**८. उत्पादनाची स्थापना करताना कोणत्याही प्रकारे झीज किंवा तूट झालेली असल्यास किंवा कापडामध्ये छिद्रे असल्याचे दिसल्यास स्थापना करणारी कंपनी त्याच्या दुरुस्तीसाठी जबाबदार असेल.**

**९. शेततळयाजवळ एखादी विहीर, तलाव, कालवा किंवा नदी असल्यास या पाण्याच्या जागांमधून झिरपणारे पाणी तळयाच्या लायनिंगखाली जाऊन माती सैल करून त्याची धूप करू शकते. तळयाच्या लायनिंगखालील माती झिरपल्याच्या किंवा धूप झालेल्या जागांमुळे कापड फाटू शकते किंवा अतिरिक्त ताणामुळे त्यात गळती होऊ शकते. त्यामुळे तळयाच्या भिंतीही कमकुवत होऊ शकतात. त्यामुळे ग्राहकोंने या प्रकरणी स्थापत्य अभियंत्यांचा सल्ला घेणे गरजेचे आहे जेणेकरून जवळच्या जाणार नाही. जागांमुळे तळयाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाऊ शकेल. वरील कारणांमुळे झालेले नुकसान वॉरंटीअंतर्गत कव्हर केले जाणार नाही.**

**१०. शेततळयाच्या भिंतींमध्ये कोणत्याही प्रकारचे पाइप लावण्यात येऊ नयेत. यामुळे झालेले नुकसान वॉरंटीअंतर्गत कव्हर केले जाणार नाही.**

**११. इंस्टॉलेशन पूर्ण झाल्यापासून 5 ते 10 दिवसांच्या कालावधीत शेततळे हळूहळू पाण्याने भरले आहे याची ग्राहकाने खात्री करणे आवश्यक आहे. तसेच शेततळे पाण्याने भरलेले ठेवणे आवश्यक आहे.**

**१२. ग्राहक उक्तनिर्देशित तपासणी पूर्ण होईपर्यंत कोणतेही लायनर दुरूस्त करणार नाही, बदलणार नाही, त्यात फेरबदल किंवा अडथळे करणार नाही आणि ग्राहक इतर कोणत्याही व्यक्तीला कोणतेही लायनर दुरुस्त करू देणार नाही, बदलू देणार नाही, त्यात फेरबदल किंवा अडथळे निर्माण करू देणार नाही. तथापि, व्यक्ती, मालमत्ता किंवा पर्यावरणाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी अत्यावश्यक कारवाई करू शकेल. या उताऱ्याच्या पूर्ततेत अपयश आल्यास ही वॉरंटी रद्द ठरू शकते.**

**१३. वैध दावा केल्याच्या परिस्थितीत पुरवठादार हा दावा आपल्या प्रतिनिधीकडून तपासून घेईल आणि आपल्या स्वेच्छेने उत्पादन बदलून देईल किंवा दुरूस्त करेल. ग्राहकाला उत्पादनाच्या स्थापनेसाठी स्वच्छ, कोरडी, विनाअडथळा, सुस्पष्ट आणि विनाप्रतिबंध जागा देणे आवश्यक आहे.**

**१४. तळयाच्या लायनरच्या दुरुस्तीदरम्यान कोणतेही पाणी तळयातून बाहेर काढण्यासाठी किंवा दुरुस्तीनंतर तळे भरण्यासाठी लागणारे कोणतेही स्थापत्य काम किंवा कोणतेही काम ग्राहकाला स्वखर्चाने करावे लागेल. तळयाच्या लायनरचे कापड स्थापित करताना सर्व टोकांना उत्पादन सैल ठेवणे ही तंत्रज्ञाची जबाबदारी आणि त्याचा निर्णय असेल. ग्राहकाने तंत्रज्ञाला स्थापनेच्या तंत्रात कोणतेही बदल करण्यासाठी मार्गदर्शन / हस्तक्षेप करू नये.**

**१५. या उत्पादनात टक्केवारीचे वॉरंटी कव्हर आहे. त्याचा अर्थ असा की उत्पादनाचा जसा वापर होईल किंवा पुरवठा झाल्याच्या तारखेपासून संपलेल्या कालावधीत हे कव्हर कमी होईल. वॉरंटीचे मूल्य पूर्वनिश्चित आहे- म्हणजेच ते वॉरंटी कालावधीच्या ५ वर्षांसाठी प्रति वर्ष २० टक्के दराने कमी होईल आणि ३ वर्षांच्या वॉरंटी कालावधीत ते ३३ टक्के दराने कमी होईल. बदलण्याची गरज असल्यास तफावतीची रक्कम ग्राहकाला सोसावी लागेल.**

**१६. पुरवठादार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उत्पादनाची दुरूस्ती किंवा बदलण्याचे काम हाती घेतल्यास त्यांचे उत्तरदायित्व फक्त तेवढे काम पूर्ण करण्यापुरतेच मर्यादित असेल. दुरूस्ती आणि बदली करण्यासाठी आवश्यक असलेले कोणतेही स्थापत्य किंवा इतर कोणत्याही प्रकारचे काम हे ग्राहकाची जबाबदारी असेल. यात देण्यात आलेले उपाय हे लागू असलेला कायदा किंवा अन्यथा पुरवठादाराला उपलब्ध असलेले इतर कोणतेही हक्क किंवा उपाय यांच्या व्यतिरिक्त असतील.**

१७. ही वॉरंटी उत्पादनाच्या विक्रीशी संबंधित असलेल्या सर्व रकमांचे प्रदान प्राप्त झाल्यावर आणि त्याची पावती मिळाल्यावरच वैध मानली जाईल.

१८. उक्तनिर्देशित असलेली वॉरंटी हीच फक्त उत्पादनाला लागू असलेली वॉरंटी आहे आणि इतर सर्व वॉरंटी ज्या स्पष्ट केलेल्या किंवा गृहित धरलेल्या असतील, ज्यात एखाद्या विशिष्ट उद्दिष्टासाठी उत्पादनाच्या विक्रीयोग्यतेच्या किंवा मजबुतीच्या वॉरंटीचा समावेश असेल परंतु तेवढ्याच मर्यादित नाहीत त्या सर्व अस्वीकृत केल्या गेल्या आहेत.

१९. वितरक आणि ग्राहक उत्पादनासह प्रतिष्ठापने नंतर योग्य खबरदारी घेतील. जसे की उत्पादनावर कव्हर सिस्टीम निश्चित करणे, द्रव सतत पडत असलेल्या भागाला बळकट करणे, आवश्यकतेनुसार कंपन-विरोधी माऊंट किंवा फ्लोट्स स्थापित करणे इत्यादी ग्राहक याची खात्री करेल की शेततळयाचे फॅब्रिक शेततळयाचा वरच्या खड्ड्यात व्यवस्थित केले जाईल जेणेकरून पाणी भरल्यानंतर शेततळयाचे कापड तळयात घसरणार नाही.

२०. वर नमूद केलेल्या वॉरंटी वगळता, कोणत्याही विक्री किंवा विक्रेत्याच्या इतर प्रतिनिधी (वितरकासह), किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने उत्पादन किंवा त्याच्या स्थापनेशी संबंधित कोणतेही प्रतिनिधित्व किंवा हमी विक्रेतावर बंधनकारक राहणार नाही.

२१. वॉरंटीमधील कोणत्याही अटी आणि शर्ती माफ केल्यास त्या पुरवठादाराच्या संचालकांकडून किंवा प्राधिकृत सहीकर्त्यांच्या सहीने लिखित स्वरूपात दिल्या जातील. यातील कोणत्याही अटी आणि शर्तींचे कठोर पालन करण्यातील आग्रहात अपयश आल्यास वॉरंटीच्या इतर सर्व अटी आणि शर्तीच्या कठोर पालनातील माफी मानली जाणार नाही आणि ते सदर वॉरंटीअंतर्गत भविष्यातील दाव्यांसाठी वॉरंटीच्या अटी आणि शर्तीबाबत सोडून दिल्या अशा प्रकारे कार्यान्वित केले जाणार नाही.

२२. कोणत्याही परिस्थितीत विक्रेता उत्पादनाच्या वापरासाठी किंवा त्याच्याशी संबंधित कोणत्याही प्रत्यक्ष, प्रासंगिक, विशेष किंवा परिणामी हानीसाठी करार किंवा जबाबदार राहणार नाही. या हमी अंतर्गत वेंडर आणि इंस्टॉलेशन कंपनीचे दायित्व आणि/किंवा अन्यथा उत्पादनाच्या विक्री आणि स्थापनेपासून विक्रेत्याने मिळवलेल्या फायद्यांच्या मर्यादेपर्यंत मर्यादित असेल.

२३. ही वॉरंटी अहस्तांतरणीय असून ती फक्त उत्पादनाच्या ग्राहकाला आणि हे उत्पादन स्थापित केले गेले असलेल्या स्थानाला वैध आहे. या अटी आणि शर्तीच्या तरतुदींनुसार हे उत्पादन बदलले गेल्यास वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे ग्राहकाला मूळ उत्पादनाच्या पुरवठ्याच्या तारखेपासून ५०० मायक्रॉनसाठी ५ वर्षांची वॉरंटी आणि ३०० मायक्रॉनसाठी ३ वर्षांची वॉरंटीचाच हक्क असेल, हे येथे स्पष्ट करण्यात येत आहे.

२४. ही वॉरंटी खालील कारणांमुळे उद्भावलेल्या कोणत्याही कथित नादुरुस्तीसाठी लागू होणार नाही:

- दैवी घटना जसे भूकंप, चक्रीवादळ, पूर इत्यादी. परंतु एवढ्याच मर्यादित नाहीत.
- आग, स्फोट आणि हानिकारक केमिकल एक्सपोजर यामुळे उत्पादनाचा ऱ्हास होवू शकतो यासोबत तेल, फिश फीड सारख्या गोष्टींमुळे देखील लाइनरला धोका संभवू शकतो. उदाहरणार्थ डीलॅमिनेशनमुळे शेततळयाच्या कापडाला फुगे (बबल) येण्याची समस्या निर्माण होऊ शकते.
- पुरवठादार किंवा त्यांचे एजंट वगळून इतर कोणत्याही व्यक्ती किंवा आस्थापनांची कृत्ये. (ज्यात कोणत्याही मर्यादांविना स्थापत्य कंत्राटदार आणि / किंवा ग्राहकाच्या इतर कर्मचाऱ्यांचा समावेश असेल.)
- ठराविक कालावधीत रंग कमी होणे किंवा एकल किंवा अनेक स्तरांचे अतिनील ऱ्हास.
- उत्पादनाच्या स्थापनेतील कोणत्याही दोषांसाठी फक्त स्थापना करणारी कंपनी जबाबदार असेल. पुरवठादार नाही.
- उत्पादनाचा गैरवापर, दुर्लक्ष, मोडतोड, अयोग्य पद्धतीने प्रक्रिया किंवा विध्वंस,
- उंदीर, प्राणी, खेकडे, पशु किंवा इतर कोणत्याही प्राण्यांकडून नासधूस आणि नुकसान.
- वस्तू पडणे, अनियमित वातावरणीय स्थिती, साइट चुकीच्या पद्धतीने तयार करणे, कमी दर्जाच्या साहित्याचा वापर किंवा पुरवठादाराच्या वाजवी नियंत्रणाबाहेर असलेल्या कोणत्याही घटनांमुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे उद्भवलेला कोणताही दोष.
- वॉरंटीचा फायदा मिळवण्यासाठी ग्राहकांनी शेततळयाभोवती खांबांची उभारणी करून तारेचे कुंपण घेणे गरजेचे आहे जेणेकरून कोणताही शेततळयात पडणार नाही.
- (एचडीपीई जिओ मेंब्रेन) हे एक असे लायनिंग आहे जे पाणी गळतीपासून रक्षण फक्त त्याच्यामागील भिंतीच्या आधाराने करते. एखाद्या प्रसंगी लायनरच्या मागे मातीची धूप झाल्यास पाण्याचा दाब सोसण्याची क्षमता त्यांच्यामध्ये नाही.
- उक्तनिर्देशित केलेल्या स्थापनेनंतरच्या सावधगिरीची पूर्तता करण्यात अपयश.

२५. ग्राहक / शेतकरी खालील गोष्टी मान्य करतात

- तळयाच्या देखभालीशी संबंधित कंपनीच्या प्रतिनिधींनी दिलेल्या सूचनांचे पालन केले जाईल. भिंतींची आणि तळयाच्या जमिनीची बांधणी आणि फिनिशिंग स्थापनेपूर्वी केलेले असेल.
- तळयाच्या सर्व कोपऱ्यांची तपासणी ग्राहकाकडून स्थापनेनंतर केली जाईल. जेणेकरून पाणी भरल्यानंतर त्यात कोणताही ताण दिसू नये. कोणत्याही प्रकारच्या समस्या आढळल्यास त्यांची माहिती तात्काळ स्थापना करणारी कंपनी आणि उत्पादन करणाऱ्या कंपनीला तात्काळ दिली जाईल.
- स्थापना पूर्ण झाल्यावर तंत्रज्ञासोबत तलावाला फेरी मारून आणि सर्व सांधे तपासले गेल्यानंतरच ग्राहकाकडून स्थापना अहवालावर सही करतील.
- ही वॉरंटी साहित्याच्या बिलाच्या तारखेपासून ५०० मायक्रॉनसाठी ५ वर्षे आणि ३०० मायक्रॉनसाठी ३ वर्षांसाठी वैध आहे. वॉरंटीचे मूल्य पूर्वनिश्चित आहे- म्हणजेच ते वॉरंटी कालावधीच्या ५ वर्षांसाठी प्रति वर्ष २० टक्के दराने कमी होईल आणि ३ वर्षांच्या वॉरंटी कालावधीत ते ३३ टक्के दराने कमी होईल.

२६. ही वॉरंटी ही भारतीय कायद्यांच्या सापेक्ष असेल आणि यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही विवादांसाठी सिल्वासा येथील न्यायालयांचे विशेष अधिकारक्षेत्र लागू होईल.

पुरवठादार कंपनी प्रतिनिधीची सही:........................................................................................................ मो. नं.:..............................................................................

डिलरची सही:........................................................................................................................ मो. नं.:..............................................................................

स्थापना करणाऱ्या कंपनीची सही........................................................................................................ मो. नं.:..............................................................................

शेतकऱ्याची सही:........................................................................................................................ मो.नं.:..............................................................................